*तिला वाटलं की ती आता खाली बाल्कनीच्या फ्लोअरवर पडणार, पण इतक्यात तिला मदत करायला उठत असलेल्या आकाशनं तिला घट्ट धरलं. “बी केअरफुल!” तो म्हणाला. ती सावरली, पण आकाशला बिलगून तशीच काही क्षण उभी राहिली. त्याची जवळीक, तिच्या केसांवर जाणवणारा त्याचा उष्ण श्वास, त्याच्या शरीराचा पुरुषी गंध, डोक्यात चढलेली वाईन आणि मनात साठलेला उद्वेग... तिला क्षणभर वाटलं- उधळून द्यावं स्वतःला आकाशवर! आजची ही संध्याकाळ सगळ्याच अर्थांनी संस्मरणीय करून टाकावी- काय फरक पडणार आहे? एका रात्रीचा तर प्रश्न आहे. उद्या आकाश  निघून जाईल, मग आहेच आपलं नेहमीचं आयुष्य...*

नवरा आणि तिच्यातला संवाद हरवलेला. आणि अशात नवरा कामासाठी बाहेर गेलेला असताना तिचा जुना मित्र घरी येतो. त्याच्याबरोबर संध्याकाळ घालवताना तिला हरवलेलं काही सापडल्यासारखं वाटायला लागतं. पुढे?